# तिसरी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१९

उमेदवाराचे नाव ________________ वय ________

परीक्षा केंद्र ________________

परीक्षा संचालकाचे नाव ________________ सही ________

तारीख ________________

लेखी परीक्षा गुणदान

| प्रश्न | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण गुण | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिति | सामान्य ज्ञान माहिती | कविता व अर्थ | वाचन प्रश्नोत्तरे | श्रवण प्रश्नोत्तरे | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

| | |
|---|---|
| एकूण अंतिम गुण | /१०० |

**प्रश्न १ अ) खालील संवाद वाचा व गोलात योग्य पर्याय लिहा.** **गुण ३**

Read following paragraph and write answer in the circle.

वर्गात बाई म्हणाल्या, “क पासून सुरू होणारे शब्द लिहा”

रमा:- मी पाच शब्द लिहिले.

अमोघ:- मी रमाच्या दुप्पट लिहिले.

कमल:- रमा, मी तर तुझ्या चारपट शब्द लिहिले.

सोहम:- माझ्या आणि रमाच्या शब्दांची बेरीज बारा आहे.

अमोघने ( १० ,८, ९ ) शब्द लिहिले. → ◯

कमलने ( १५, २०, २२ ) शब्द लिहिले. → ◯

सोहमने ( ४, ७, ३, ) शब्द लिहिले. → ◯

**प्रश्न १ ब) योग्य पर्यायाला गोल करा.** Circle the correct answer. **गुण ४**

| शब्द / अंक | अ) | ब) | क) |
|---|---|---|---|
| ८४० | आठशे चार | आठशे चाळीस | आठ चाळीस |
| ६७५ | पंचाहत्तर | सहाशे पाच | सहाशे पंचाहत्तर |
| चारशे एकोणनव्वद | ४८९ | ४९० | ८९४ |
| सातशे पंधरा | ७२५ | ७५१ | ७१५ |
| ६६ | पंचावन्न | सहाशे सहा | सहासष्ट |
| ५०२ | पाचशे दोन | दोनशे पाच | पाचशे पाच |
| चारशे बावीस | २२४ | ४२२ | ४२४ |
| एकशे एकोणऐंशी | १७९ | १९७ | ७९१ |

**प्रश्न १ क) खालील चित्रे बघा व योग्य रंगछटांना गोल करा.** **गुण ३**

See the pictures below, circle the appropriate shade of color,

| | | |
|---|---|---|
|  १ |  2 |  ३ |
|  ४ |  ५ |  ६ |

| | |
|---|---|
| १ हिवाळी जॅकेट | जांभळे, निळे, रूपेरी |
| २ फ्रॉक | पांढराशुभ्र, सोनेरी, लालसर |
| ३ नेलपेंट | गडद लाल,काळपट,पिवळसर |
| ४ खुर्चीचा रंग | बदामी,जांभळट,राखाडी |
| ५ पर्स | तपकिरी, केशरी, चंदेरी |
| ६ गुलाब | गुलाबी, निळसर, तांबूस |

**प्रश्न २ अ) खालील शब्दातील जोडाक्षरांची फोड करून लिहा. गुण ४**

Write Jodaksharphod for उदा:- वायव्य ------ वा + य + ( व् + य )

| | |
|---|---|
| कट्यार | |
| ट्रक | |
| युक्ती | |
| आग्नेय | |

**प्रश्न २ ब ) कंसातील योग्य जोडशब्द रिकाम्या जागेत भरा. गुण ३**

Fill in the blanks with appropriate compound word given below.

१) ________ चालले की लवकर पोचता येते.

( भरभर, हळूहळू, मुळूमुळू )

२) मुलांनो, ________ करू नका,गप्प बसा.

(खोडाखोड, आरडाओरडा, ओबडधोबड )

३) राघव, अभ्यासात ________ अजिबात करू नकोस.

( टंगळमंगळ, सटरफटर, अदलाबदल )

**प्रश्न २ क) खालील समूहदर्शक शब्दांच्या योग्य जोड्या लावा. गुण ३**

Match the pairs of Samuhadarshak words.

उदा:-

| **खेळाडूंचा** ⟶ | **संघ** |
|---|---|
| गायींचा | जुडगा |
| पक्ष्यांचा | जुडी |
| किल्ल्यांचा | घड |
| पालेभाजीची | थवा |
| सैनिकांची | कळप |
| केळयांचा | तुकडी |

**प्रश्न ३ अ) शब्दांतील योग्य अक्षरांवर अनुस्वार देऊन शब्द परत लिहा.** **गुण ३**

Give dots on appropriate letters and write the words again.

उदा:- माझे कुटुब ----------- माझे कुटुंब

१) दुधाची बासुदी --------------------------------------------------------

२) दोघांमध्ये सवाद --------------------------------------------------------

३) लो. टिळकाची पगडी --------------------------------------------------

४) तुझे अभिनदन -----------------------------------------------------

५) गोड करजी --------------------------------------------------------

६) वह्याचा गठ्ठा --------------------------------------------------------

**प्रश्न ३ ब) पुढील शब्दांचे लिंग बदलून लिहा.** **गुण ३**

Change the gender of following words. उदा :- हरीण – हरिणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ राजा | | २ वाघ | |
| ३ लेखिका | | ४ भाऊ | |
| ५ दोरी | | ६ देवी | |

**प्रश्न ३ क) अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य परत लिहा.** **गुण ४**

Rewrite the sentences by changing singular/plural form of underlined words.

उदा:- रात्री विमान आकाशात उडाले. ⟶ रात्री विमाने आकाशात उडाली.

१) समोरच्या झाडावर कावळे बसले.

____________________________________________

२) भाकरी छान फुगली.

____________________________________________

३) झाडावरून आंबे खाली पडले .

____________________________________________

४) बटण दाबले की दिवा लागतो.

____________________________________________

**प्रश्न ४ अ) खालील विशेषणे वाचा व चित्राच्या आधारे पुढील वाक्ये पूर्ण करा.**

Complete sentences with help of pictures and following adjectives. **गुण ३**

(मोठा, चार, धारदार, छोटा, मऊ, खोल)








१) माद्रिद शहरात ह्या ------------------ प्रसिध्द इमारती आहेत.

२) सर्वात ----------------- भोपळा म्हणून पहिले बक्षीस जॉनलाच मिळेल.

३) अनिकाचे खेळणे खूप ----------------- आहे.

४) हा पक्षी खूप ----------------- आहे.

५) ------------------ सुरीने भाजी उत्तम कापली जाते.

६) ग्रँड कॅनियन येथे -------------- दरी आहे.

**प्रश्न ४ ब) खालील वाक्यात योग्य अव्यये लिहा .** **गुण ३**

Write appropriate conjunctions in the sentences below.

(कारण, तरीही, किंवा, म्हणून, आणि, की)

१) मला क्रिकेट खेळायला आवडते ---------- मी रोज क्रिकेट खेळतो.

२ ) मी,आई,बाबा ------- दादा पत्ते खेळतो.

३) परीक्षा झाल्या ----------- आम्ही भारतात जाणार आहोत.


४) भाजी खारट झाली, --------- भाजीत मीठ जास्त झाले .

५) माझी आई ------------ आजी रोज देवाची पूजा करते .

६) अमोलने मला तिळगुळ दिला ---------- मी त्याच्याशी बोललो नाही.

**प्रश्न ४ क) खालील कुटुंबाचा तक्ता बघा. वाक्यात योग्य नाती भरा.** **गुण ४**

See the family tree and fill in the blanks with appropriate relations.




१) देवयानी ही यशची ----------------- आहे.


२) वैभव आरतीचा --------------- आहे.

३) रिया ही राहुलची ---------------- आहे.

४) राहुल हा किशोरचा --------------- आहे.

**प्रश्न ५ अ) खालील चित्रातील योग्य दिशा बघून वाक्ये पूर्ण करा.** **गुण ५**

Complete sentences by filling proper directions in Marathi.







१) खिडकीच्या --------------- ( वायव्य, नैर्ऋत्य ) दिशेला शोकेस आहे.

२) चित्राच्या ----------------  ( पूर्व, आग्नेय) दिशेला झाड आहे.

३) टीपॉयच्या ---------------- ( पश्चिम, दक्षिण) दिशेला टेबल आहे.

४) सियाला टी.व्ही. ---------------- (उत्तर, ईशान्य) दिशेला दिसतो.

५) सियाला ---------------( वायव्य, नैर्ऋत्य ) दिशेला चित्र दिसते.

**प्रश्न ५ ब) घटनेप्रमाणे खालील वाक्यांचा क्रम लावा.** **गुण ५**

Read sentences and assign the number in order of events.

(       )  वेलाला काकड्या आल्या.

(       )  काकडीचा वेल वाढू लागला.


(       )  कुंडीत काकडीच्या बिया पेरल्या.

(       )  आईने काकडीची कोशिंबीर केली.

(       )  काकडीच्या वेलाला फुले आली.

**प्रश्न ६ अ) खालील चित्रे बघा व गुढीपाडवा ह्या सणावर ५ वाक्ये लिहा.** **गुण ५**

Write five sentences based on the pictures of GudhiPaadava.





______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**प्रश्न ६ ब) खालील वाक्ये वाचून बरोबर किंवा चूक अशी खूण करा.**

Mark right or wrong. **गुण ५**

१) वसंत ऋतूत झाडाची पाने गळतात. (        )

२) वर्षा ऋतूत साचलेल्या पाण्यात होडी सोडायला खूप मजा येते. (        )

३) चैत्र महिन्यात दिवाळी असते (        )

४) श्रावण महिन्यानंतर भाद्रपद हा महिना येतो. (        )

५) हिवाळ्यात आम्ही गरम कपडे घालतो (        )

**प्रश्न ७ अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **गुण २**

Fill in the blanks with the choices given. ( वाळवंट, धबधबा, बोगदा , शिखर, दरी )

१) जिकडे बघावे तिकडे वाळू. -----------------

२) पर्वताचे उंच टोक. -----------------

३) उंचावरून पडणारे पाणी. ----------------

४) डोंगर फोडून केलेला रस्ता. -----------------

**प्रश्न ७ ब) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.** **गुण ५**

Fill in the blanks with the correct word.

१) पहिली मुलींची शाळा सुरू केली ------------

( झाशीची राणी, ज्योतिबा फुले, रमाबाई रानडे )

२) राणी लक्ष्मीबाईंचे बालपणीचे नाव -------------- ( मनकर्णिका, लक्ष्मीबाई, द्रौपदी )

३) गुरु द्रोणाचार्यांनी घेतलेल्या परीक्षेत ------------ हा शिष्य विजयी झाला.

(दुर्योधन, युधिष्ठिर, अर्जुन )

४) ------------ ही महाराष्ट्राची राजधानी आहे. (मुंबई, नागपूर, दिल्ली )

५) वहीचा आकार ------------------ असतो. (गोल, त्रिकोणी, आयताकृती )

**प्रश्न ७ क) खालील कोणत्याही एका विषयावर चिठ्ठी लिहा.** ( ३ ते ४ वाक्ये ) **गुण ३**

Write a note on one of the topics given below. ( 3 or 4 sentences )

आई – मुलीला, टेबलावर खाणे ठेवले आहे.

किंवा

मुलगा --- बाबांना, मला शाळेच्या प्रोजेक्टसाठी सामान पाहिजे आहे.

**प्रश्न ८ अ) पुढील उतारा वाचा व खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **गुण ४**

Read the passage and write the answers below.

हे आमच्या शाळेचे मैदान आहे.मैदानाच्या कडेला रंगीबेरंगी फुलांची झाडे आहेत. मैदानाच्या एका बाजूला आम्ही बास्केटबॉल खेळतो, तर दुसऱ्या बाजूला सॉकरचे मैदान आहे.मैदानाच्या सभोवती धावण्याचा ट्रॅक आहे. दर महिन्यात तेथे आमच्या धावण्याच्या शर्यती होतात. मी त्यात भाग घेतो व कधी कधी पहिला येतो. हिवाळयात आम्ही बर्फाचे गोळे एकमेकांच्या अंगावर फेकतो.

१) मैदानाच्या कडेला काय आहे?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२) शाळेत धावण्याचा ट्रॅक कोठे आहे?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) मैदानावर कोणकोणते खेळ खेळले जातात?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

४) हिवाळयात मुले काय करतात?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**प्रश्न ८ ब) इंग्रजीत भाषांतर करा.** Translate in English. **गुण ३**

माझे आजोबा ८० वर्षांचे आहेत. ते चालताना काठी वापरतात. रोज रात्री ते मला गोष्टी सांगतात.ते आमच्या बरोबर पत्ते खेळतात.माझे आजोबा मला फार आवडतात.

**प्रश्न ८ क) मराठी भाषांतर करा.** Translate in Marathi. **गुण ३**

I go to our library and read the books. I also like to read history books. Kids like books with pictures. We should read lot of books.